वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील विविध शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील राजपत्रित अधिकारी यांचे गोपनीय अहवालाकरीता प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी घोषीत करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांकः नस्ती क्र .:MEDD-१२/११४/२०२५-MMD(Vais-२) ई- १८०५५०९

गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई -४०० ००१

तारीख: २४ ऑगस्ट, २०२६

**वाचा**

१) शासन निर्णय सामान्य प्रशासान विभाग क्रमांक- सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि.०१.११.२०११

२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.पदनि २४२० / प्र.क्र.१४५ /२०२०/वैसेवा-१, दि.०६.१०.२०२१

३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/गोपनीय /अहवाल/२७१/२०२३,दि.३१.०१.२०२३

४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.२४ /२०२३/ वैसेवा-१, दि.१५.०२.२०२३

५) शासन निर्णय क्रमांकः नस्ती क्र .:MEDD-१२/११४/२०२५-MMD(Vais-२) ई- १३८७६९३ दि.२७.१०.२०२५

**प्रस्तावना**

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.१ येथील दि.०१.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमीत केल्या असून गोपनीय अहवाल लिहिणे व संबंधीतांना अवगत करणे याकरीता कालमर्यादा विहीत करुन दिलेली आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील विविध शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी दि.२७.१०.२०२५ अन्वये प्रतिवेदन / पुनर्विलोकन अधिकारी घोषीत करण्यात आले होते. गोपनीय अहवालांचे संस्करण वेळीच होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच प्रशासकीय कारणास्तव त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत विषद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील विविध शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील राजपत्रित अधिकारी यांच्या गोपनीय अहवालांकरीता खालीलप्रमाणे प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी घोषीत करण्यांत येत आहेत.

| अ.क. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) | सचिव / प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (वैद्यकीय शिक्षण) |
| २ | सह संचालक ( वैद्यकीय / दंत / प्रशासन ) | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) | सचिव / प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (वैद्यकीय शिक्षण) |
| ३ | अधिष्ठाता (वैद्यकीय) | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| ४ | अधिष्ठाता (दंत) | सह संचालक (दंत) | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| ५ | सुश्रुषा सेवा अधिक्षीका | सह संचालक (परीचर्या) | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |

| अ.क. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| ६ | प्राध्यापक (वैद्यकिय) अमरावती विभाग, नागपूर विभाग | अधिष्ठाता | सह संचालक ( प्रादेशिक) (नागपूर) |
| ७ | प्राध्यापक (वैद्यकिय) छत्रपती संभाजीनगर विभाग, नाशिक विभाग | अधिष्ठाता | सह संचालक (प्रादेशिक) (छत्रपती संभाजीनगर) |
| ८ | प्राध्यापक (वैद्यकिय ) कोकण विभाग | अधिष्ठता | सह संचालक (मुख्यालय ) |
| ९ | प्राध्यापक (वैद्यकिय ) पुणे विभाग | अधिष्ठता | सह संचालक (मुख्यालय) |
| १० | प्राध्यापक (दंत) | अधिष्ठाता | सह संचालक (दंत) |
| ११ | सहयोगी प्राध्यापक (वैद्यकीय / दंत) | विभाग प्रमुख | अधिष्ठाता |
| १२ | सहायक प्राध्यापक (वैद्यकीय / दंत) | विभाग प्रमुख | अधिष्ठाता |
| १३ | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता | संचालक |
| १४ | वैद्यकीय उपअधिक्षक | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| १५ | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| १६ | दंतशल्यचिकीत्साशास्त्र | विभागप्रमुख | अधिष्ठाता |
| १७ | मुख्य प्रशासकीय अधिकारी (संचालनालयाच्या आस्थापनेवरील ) | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| १८ | मुख्य प्रशासकीय अधिकारी (संचालनालया व्यतिरिक्त) ) | अधिष्ठाता | सह संचालक (वैद्यकीय) |
| १९ | प्रशासकीय अधिकारी (संचालनालयाच्या आस्थापनेवरील ) | मुख्य प्रशासकीय अधिकारी | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| २० | प्रशासकीय अधिकारी (अमरावती/नागपूर विभाग ) | अधिष्ठाता | सह संचालक (प्रादेशिक) (नागपूर) |
| २१ | प्रशासकीय अधिकारी (छत्रपती संभाजीनगर विभाग /नाशिक विभाग) | अधिष्ठाता | सह संचालक (प्रादेशिक) (छत्रपती संभाजीनगर) |
| २२ | प्रशासकीय अधिकारी (कोकण विभाग ) | अधिष्ठाता | सह संचालक (मुख्यालय) |
| २३ | प्रशासकीय अधिकारी (पुणे विभाग ) | अधिष्ठाता | सह संचालक (मुख्यालय) |
| २४ | सहायक संचालक (लेखा ) | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| २५ | लेखा अधिकारी | सह संचालक (वैद्यकीय ) | संचालक |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
SHWETAMBARI PRAVIN KHADE
Date: 2026.08.24 11:47:47
+05'30'

(श्वेतांबरी खडे)
उपसचिव ,महाराष्ट्र शासन

प्रती,

१. आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई

प्रत,

१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये (संचालनालया मार्फत)
२) निवडनस्ती वैसेवा -२